24 336/37

जा.क्र.शिउसं/प्रावि-५/२००८-०९/
शिक्षण उपसंचालक कार्यालय,
औरंगाबाद विभाग औरंगाबाद.
दिनांकः- 22 MAY 2009

प्रति,

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद,औरंगाबाद.

विषयः-खाजगी अनुदानित/विना अनुदानित खाजगी प्राथमिक शाळांना इयत्ता १ ली ते ७ वी चे नैसर्गिक वाढीचे वर्ग/तुकडया मंजूर होणेबाबत..

संदर्भः-१) शासन निर्णय क्रमांकः-प्राशान्य-१६०५/(३४८/०५)/प्राशि-३ दिनांकः-८/७/२००५
२) मा.शिक्षण संचालक(प्राथमिक) महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे पत्र क्रमांकः-खाप्राशा/२००४-०५/तुमा/ड-५१२ दिनांकः-२३/७/२००५
३)शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद,औरंगाबाद यांचे पत्र क्रमांकः-जिपऔ/शिक्षण/प्रावि-३/२००८-०९/१०६५ दिनांकः-१३/०४/२००९ व या विभागास प्राप्त दिनांकः-२०/०४/२००९ चे पत्र.

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की संदर्भीय पत्रान्वये या कार्यालयास दिलेल्या अधिकाराप्रमाणे आपल्या जिल्हयातील खालील प्राथमिक शाळेस त्यांच्या नावापुढे दर्शविल्याप्रमाणे अनुक्रमांक-५ मध्ये दर्शविलेल्या वर्षापासून विना अनुदान तत्वावर नैसर्गिक वाढीचे वर्ग मंजूर झालेले आहे.सदर वर्ग खालील दर्शविलेल्या अटींच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.खालील अटींच्या पूर्तता होत असल्याचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी खात्री करुन सबंधित शाळेस नैसर्गिक वाढीचे वर्ग मंजूर करण्यात यावेत.

| अ.क्र. | प्राथमिक शाळेचे नांव | माध्यम | इयत्ता | शासनाने मंजूर केलेले नैसर्गिक वाढ वर्ग व वर्ष |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १) | योगेश्वरी प्राथमिक विद्यामंदीर, बजाजनगर,वाळूज ता.गंगापूर, जि. औरंगाबाद. | मराठी | इयत्ता ६ वी प्रथम वर्ग<br>इयत्ता ७ वी प्रथम वर्ग | सन २००५-२००६ पासून<br>सन २००६-२००७ पासून विना अनुदान तत्वावर. |

१) नैसर्गिक वाढीचे वर्ग/तुकडयांचे वाटप करतांना शा.नि.दि.२/१२/१९९६ मध्ये नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्यात यावी.

२) मंजूर करावयाच्या नैसर्गिक वाढीचे वर्ग/तुकडयांची गरज आहे,याची खातरजमा करुन त्यानंतरच वर्ग/तुकडया मंजूर झालेल्या शैक्षणिक वर्षापासून प्रत्यक्ष सुरु असल्याची खात्री करुन मगच मंजूर करण्यात याव्या.

३) ज्या शाळांना विना अनुदान तत्वावर मंजूर (कालांतराने अनुदान तत्वावर येणा-या) परवानगी देण्यात आलेली आहे अशा शाळांना मंजूर करण्यात येणा-या नैसर्गिक वाढीच्या वर्गांना (प्रथम)शासन निर्णय क्रमांकः-व्हीएलएस/१०००/(२४५५)/प्राशि-१ दिनांकः-८/११/२००० मध्ये नमूद केलेले अनुदान सुत्र लागू होईल.

४) शिक्षणाधिकारी प्राथमिक यांनी विना अनुदान तत्वावर मंजूर करण्यात आलेल्या पात्र वर्ग/तुकडयांना ५ व्या वर्षी २०% अनुदान तत्वावर आणण्यासाठी आवश्यक तरतूद सबंधित वर्षात जिल्हानियोजन व विकास समित्याकडून उपलब्ध करुन घ्यावी.

५) खाजगी अनुदानित अथवा विना अनुदानित कोणत्याही प्राथमिक शाळेच्या ज्या तुकडीस/नवीन वर्गास/नैसर्गिक वाढीस मंजूरी देण्याचे अधिकार शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना नाहीत याची नोंद घ्यावी.

**शिक्षण उपसंचालक,**
**औरंगाबाद विभाग औरंगाबाद.**

प्रत माहितीस्तवः-
मुख्याध्यापक, योगेश्वरी प्राथमिक विद्यामंदीर, बजाजनगर,वाळूज ता.गंगापूर, जि. औरंगाबाद.